<u>प्रेसनोट</u>                                        दि.३१/०७/२०१७

**आज दि.३१/०७/२०१७ (सोमवार) रोजी सेवा निवृत्त होणारे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती सत्कार समारंभ .......**

दर महिन्याला नियत वयोमानानुसार जे पोलीस अधिकारी व कर्मचारी सेवा निवृत्त होतात. त्यांचा आज **दि.३१/०७/२०१७ रोजी पुणे शहर पोलीस आयुक्तालयातील एकुण <u>०९</u> पोलीस अधिकारी व कर्मचारी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत.** मा.श्रीमती.रश्मि शुक्ला,पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे हस्ते सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा सत्कार समारंभ त्यांचे कुटुंबियासह आयोजीत केला होता.

**सदर वेळी मा.पोलीस आयुक्त,श्रीमती.रश्मि शुक्ला यांनी एकुण <u>०९</u> पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना शाल,श्रीफळ, तसेच स्मृतिचिन्ह व निवृत्तीचे प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले आहे.** मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व सेवा निवृत्त पोलीसांना आवाहन केले की,जर तुम्हांला छंद असल्यास खात्यातील नोकरीमुळे त्या छंदाचा विसर पडला असले तर तो पुन्हा जागृत करा, विशेष करुन आपल्या तब्येतीकडे लक्ष दया. पोलीस खात्यामध्ये नोकरी करीत असताना, अडचणीमुळे आपल्याला पर्यटण करता आले नाही. तरी आपण दुर दुर पर्यटन करावे. ज्या नातेवाईक, मित्रपरिवार यांना तुम्हाला भेटता आले नाही, त्यांना आता जरुर वेळ देवुन, त्यांची भेट घ्या असे सांगितले.

**यातील ०९ पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेपैकी <u>०८</u> पोलीस अधिकारी व कर्मचारी यांची पेन्शन तात्काळ मंजुर करण्यात आली आहे.** मा.पोलीस आयुक्त यांनी सेवा निवृत्त पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना व त्यांच्या कुटुंबियांना भावी आयुष्यातील वाटचालीबाबत शुभेच्छा दिल्या.

<u>सेवा निवृत्त अधिकारी व कर्मचारी पुढील प्रमाणे –</u>

| अक्र | अधिकारी व कर्मचारी नांव | पद | नेमणूक |
|---|---|---|---|
| १. | ज्ञानेश्वर कमाजी केदारी | पोउपनिरीक्षक (अभावित) | मोटार परि.विभाग |
| २. | श्रीरंग नागनाथ बिराजदार | पोउपनिरीक्षक (अभावित) | यरवडा पो स्टेशन |
| ३. | सदानंद लक्ष्मण देसाई | सहा.पो.उपनिरीक्षक | विशेष शाखा |
| ४. | किशोर रामचंद्र सुर्वे | पोउपनिरीक्षक (अभावित) | मोटार परि. विभाग |
| ५. | नईम बशीर शेख | पोउपनिरीक्षक (अभावित) | वानवडी पो स्टेशन |
| ६. | विवेकानंद तात्या क्षिरसागर | सहा.पो.उपनिरीक्षक | पिंपरी-चिंचवड अतिक्रमण |
| ७. | गजानन दामु कांबळे | सहा.पो.उपनिरीक्षक | वाहतुक विभाग |
| ८. | शशिकांत गणपतराव देशमुख **(स्वेच्छा सेवानिवृत्त)** | पोहवा/२१८१ | वाहतुक विभाग |
| ९. | सिमा एस भुतकर | प्रमुख लिपीक | उ.प्रादेशिक विभाग |

या प्रसंगी श्री.रविंद्र कदम,सह पोलीस आयुक्त, श्री.साहेबराव पाटील,अपर पोलीस आयुक्त,(प्रशासन),पुणे, श्री.बी.जी.गायकर,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-१,पुणे, श्री.शेषराव सुर्यवंशी,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-२,पुणे हे अधिकारी हजर होते.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचालन श्री.शेषराव सुर्यवंशी,पोलीस उप-आयुक्त,मुख्यालय-१,पुणे शहर यांनी केले.

**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**